# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

Dr. V. S. Irpate
Programme Coordinator (I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: - unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/DSW / 312 /2016 Dt: 15/06/2016

## अतिमहत्वाचे

प्रति,

**मा. प्राचार्य**
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय : सन–२०१६ मधील पावसाळ्यात दि. ०१ ते ०७ जूलै, २०१६ या ''वन महोत्सव'' कालावधीत दि. ०१ जूलै, २०१६ या एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत.**

संदर्भ :– १) शासन निर्णय क्र. सावनि–२०१५/प्र.क्र. १३१/फ–११ मंत्रालय, मुंबई, दि. ३१ मार्च, २०१६.
२) पत्र क्र. गोंविग/कुसका/२६४९/२०१६ दि. ३०/०५/२०१६.
३) पत्र क्र. GU/DSW/306/2016 dated 07/05/2016

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दि. ०१ जूलै, २०१६ या एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवड करणे या कार्यक्रमांतर्गत विभागाच्या यंत्रणेबराबरच स्वयंसेवी व अशासकीय संस्था, खाजगी उद्योजक, उद्योजकता सामाजिक दायीत्व, सहकारी संस्था, विविध सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारी मंडळे व संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकप्रतिनिधी इत्यादिंचा लोकसहभाग घेण्याचे नियोजित आहे.

त्या अनुषंगाने, या कार्यक्रमांतर्गत वन व सामाजिक वनिकरण विभाग आणि महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ यांच्या मार्फत कमितकमी १.५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट ठेवले आहे. उर्वरीत ५० लक्ष वृक्ष लागवड इतर विभागामार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सहभाग आहे. यामध्ये विद्यापीठ, महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे परिसरात मोकळ्या जागेवर अनुक्रमे १००, ५० व २० रोपे लागवड करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे.

तरी कृपया सर्वांनी याची नोंद घेवून प्रत्येक महाविद्यालयाने याकरीता १ समन्वयकाची नेमणून करुन दि. २१ जून, २०१६ पर्यंत आपल्या महाविद्यालयीन परीसरामध्ये किमान ५० खड्डे खोदून वृक्षरोपनाची तयारी ठेवावी व याबाबतची सविस्तर माहिती दि. १८/०६/२०१६ रोजी nssdsw.gug@gmail.com या मेलवर तातडीने पाठवावी. दि. ०१ जूलै, २०१६ रोजी आपल्या सोयीनुसार जवळच्या नर्सरीमधून रोपटे खरेदी करावे तसेच होणारा खर्च हा महाविद्यालयाने करावयाचा आहे.

धन्यवाद!

संचालक (प्र)
विद्यार्थी कल्याण विभाग तथा
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली